**SVKM's NARSEE MONJEE COLLEGE OF COMMERCE AND ECONOMICS**
**(EMPOWERED AUTONOMOUS)**
**JVPD SCHEME, VILE PARLE – WEST, MUMBAI – 400 056.**

09.05.2025

# NOTICE

Students who wish to apply for class improvement of HSC board exam, to be held in June/July 2025 should approach the college office before 17.05.2025.

Details regarding the fees is mentioned in the circular attached.

Dr. Parag Ajagaonkar
Principal

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

# प्रकटन

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या निकालाबाबत**

---

मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर **सोमवार दिनांक ०५ मे, २०२५** रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. https://results.digilocker.gov.in
२. https://mahahsscboard.in
३. http://hscresult.mkcl.org
४. https://results.targetpublications.org
५. https://results.navneet.com
६. https://www.tv9hindi.com/education/board-exams/maharashtra-board-exams
७. https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-hsc-12-results
८. https://www.indiatoday.in/education-today/results
९. https://www.aajtak.in/education/board-exam-results

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आऊट) घेता येईल. त्याचप्रमाणे Digilocker app मध्ये Digital गुणपत्रिका संग्रहीत करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच https://mahahsscboard.in ( in college login ) या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरुन स्वत: किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. **गुणपडताळणीसाठी व उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी मंगळवार, दिनांक ०६/०५/२०२५ ते मंगळवार, दिनांक २०/०५/२०२५ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.** त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking याद्वारे भरता येईल.

ACE Scanner

२) फेब्रुवारी-मार्च २०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या तीन संधी (जुन-जुलै २०२५, फेब्रुवारी-मार्च २०२६ व जुन-जुलै २०२६) श्रेणी/गुणसुधार (**Class Improvement Scheme**) योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जुन-जुलै २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बुधवार दिनांक ०७/०५/२०२५ पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

दिनांक: ०४/०५/२०२५

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

PDF Scanner ACE Scanner

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

ई-मेलद्वारे
तातडीचे

क्र.रा.मं./ले–पे०६/परीक्षा शुल्क २०२५–२६/ 1453
पुणे ४११००४
दि. 24/04/2025

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:– उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२५ व मुख्य परीक्षा २०२६ साठी परीक्षा शुल्कामध्ये वाढ करणेबाबत....

संदर्भ:– १. क्र.रा.मं./लेखा/६/२३४४ पुणे ०४, दि.०२/०६/२०२३.
२. शालेय शिक्षण क्रीडा विभागाचे पत्र क्र. संकीर्ण ०८२२/प्र.क्र.६६/एसडी–२, दि. १६/१२/२०२२
३. कार्यकारी परिषद (तदर्थ) सभा दि.२४/०३/२०२३ ठराव क्र. १३२.

उपरोक्त विषयास अनुसरून शासन आदेश आणि कार्यकारी परिषद (तदर्थ) सभेतील निर्णयाच्या अनुषंगाने, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२५ व मुख्य परीक्षा २०२६ साठी परीक्षा शुल्क पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत. सुधारित परीक्षा शुल्क आपल्या स्तरावरून सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना अवगत करावे आणि मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२५ व फेब्रुवारी–मार्च २०२६ साठी परीक्षा शुल्क

नियमित व खाजगी विद्यार्थी (इ.१२वी)

विज्ञान/कला/वाणिज्य/ MCVC /द्विलक्षी शाखा

| अ.क्र. | तपशील | सन २०२५–२६ साठी परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | परीक्षा शुल्क | ५८० |
| २ | प्रशासकीय शुल्क | २० |
| ३ | गुणपत्रिका शुल्क | २० |
| ४ | प्रमाणपत्र शुल्क | २० |
| ५ | प्रात्यक्षिक परीक्षा (प्रति विषय) | १५ |
| | MCVC प्रात्यक्षिक परीक्षा (प्रति विषय) | ३० |
| ६ | माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क (प्रति विषय) | २०० |
| ७ | खाजगी विद्यार्थी नोंदणी शुल्क | ११२० |
| ८ | खाजगी विद्यार्थी प्रक्रिया शुल्क | १०० |

## पुनर्परीक्षार्थी (Repeater) व तुरळक विषय (Isolated)((इ.१२वी २०२५–२६)
### विज्ञान/कला/वाणिज्य/ MCVC /द्विलक्षी शाखा

| अ.क्र. | तपशील | सन २०२५–२६ साठी परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | परीक्षा शुल्क | ५४० |
| २ | प्रशासकीय शुल्क | २० |
| ३ | गुणपत्रिका शुल्क | २० |
| ४ | प्रात्यक्षिक परीक्षा(प्रति विषय) | १५ |
| | MCVC प्रात्यक्षिक परीक्षा(प्रति विषय) | ३० |
| ५ | माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क(प्रति विषय) | २०० |

## श्रेणीसुधार (Class Improvement)(इ.१२वी २०२५–२६)

| अ.क. | तपशील | सन २०२५–२६ साठी परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणारे नियमित विद्यार्थी/पुनर्परीक्षार्थी/खाजगी विद्यार्थी | १०७० |
| २ | प्रशासकीय शुल्क | २० |
| ३ | गुणपत्रिका शुल्क | २० |
| ४ | प्रात्यक्षिक परीक्षा(प्रति विषय) | १५ |
| | MCVC प्रात्यक्षिक परीक्षा(प्रति विषय) | ३० |
| ५ | माहिती तंत्रज्ञान विषय शुल्क(प्रति विषय) | २०० |

उपरोक्तप्रमाणे सुधारित परीक्षा शुल्क आकारणीबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयाना कळविण्यात यावे आणि मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:–
१.परीक्षा शाखा, राज्यमंडळ पुणे–०४
२.गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे–०४